क्रमांक :- १७२

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

**शनिवार, दिनांक २३ डिसेंबर, २०२३/ पौष २, १९४५ शके**

१७२. सर्व मा.सदस्यांना कळविण्यात येते की, ज्याअर्थी ४९-सावनेर मतदार संघातून महाराष्ट्र विधानसभेवर निवडून आलेले सदस्य श्री.सुनिल छत्रपाल केदार, रा.पाटणसावंगी, ता.सावनेर, जि.नागपूर यांना व्दितीय अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर यांनी (गुन्हा क्र. १०१/२००३ मध्ये) दिनांक २२ डिसेंबर, २०२३ रोजी भारतीय दंड विधानाच्या कलम ४०६, ४०९, ४६८, ४७१, १२० (ब) व ३४ अन्वये पाच वर्षे सक्तमजुरीच्या कारावासासह रुपये १२,५०,०००/- चा दंड ठोठावण्यात आला आहे.

आणि ज्याअर्थी उक्त शिक्षेच्या परिणामस्वरुप शिक्षा ठोठावल्याच्या दिनांकापासून म्हणजेच दिनांक २२ डिसेंबर, २०२३ रोजीपासून श्री.सुनिल छत्रपाल केदार, महाराष्ट्र विधानसभा सदस्य हे राज्यघटनेच्या अनुच्छेद १९१ (१) सह लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम ८ अन्वये महाराष्ट्र विधानसभेचे सदस्य राहण्यास अनर्ह ठरत आहेत.

त्याअर्थी श्री.सुनिल छत्रपाल केदार, महाराष्ट्र विधानसभा सदस्य यांची जागा राज्यघटनेच्या अनुच्छेद १९० च्या उपखंड (३) (क) अन्वये त्यांना शिक्षा ठोठावल्याच्या दिनांकापासून म्हणजेच दिनांक २२ डिसेंबर, २०२३ रोजीपासून रिक्त झाली आहे.

**विधान भवन,**
नागपूर.
दिनांक : २३ डिसेंबर, २०२३

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१ (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा

**याची प्रत :**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.
३. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
४. संगणक कक्ष (Website)
५. एम.के.सी.एल.